गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८


दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २२८ वा ● रविवार ०७ जानेवारी २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 228 | Date : 07/01/2024 | blow :Sunday | Page 4 | Price 4

## अभिमानास्पद..! इस्रोची यशस्वी झेप
### आदित्य एल १ नियोजित ठिकाणी पोहचलं

मुंबई : इस्रोकडून लॉन्च करण्यात आलेले आदित्य एल १ हे यान त्याच्या नियोजित ठिकाणी पोहचले आहे. यामुळे भारताला आता सूर्याचा अभ्यास करता येईल. आदित्य L-1 हे L-1 बिंदूवर पोहोचलं आहे. सूर्याच्या L-1 बिंदूला halo orbit म्हणतात. २ सप्टेंबर २०२३ मध्ये इस्रोने सूर्याचा अभ्यास करण्यासाठी आदित्य L-1 हे अंतराळात पाठवले होते. आदित्य एल१ मध्ये सात पेलोड्स बसवण्यात



आले आहेत. यामधील चार पेलोड्स हे थेट सूर्याचा अभ्यास करणार आहेत. तर उर्वरित तीन हे वातावरणाचा अभ्यास करतील. विशेष म्हणजे ग्रहणकाळात देखील सूर्याचा अभ्यास करण्यास कोणतीही अडचण निर्माण होणार नसल्याचं इस्रोच्या शास्त्रज्ञांकडून सांगण्यात येत आहे. सूर्य हा एक तारा आहे. त्यामुळं सूर्यावर सतत काही ना काही स्फोट होत असतात. पण या कोणत्याही स्फोटांचा परिणाम या यानावर होणार नाही. सूर्यामधील अनेक रहस्यांचा उलगडा करण्यास हे यान इस्रोला मदत करेल.

आदित्य-L1 वरून सूर्याचे पहिले चित्र फेब्रुवारी किंवा मार्चमध्ये मिळणार आहे. VELC ची निर्मिती भारतीय खगोल भौतिकी संस्थेने केली आहे. इस्रोच्या सन मिशनमध्ये स्थापित VELC सूर्याचे एचडी फोटो घेईल. L1 पर्यंतचा प्रवास पूर्ण केल्यानंतर आदित्यचे सर्व पेलोड्स चालू होतील. म्हणजे त्यात बसवलेली सर्व उपकरणे सक्रिय होतील. त्यानंतर आदित्य । पान २ वर

## सोलापुरात हिंदु जन आक्रोश मोर्चादरम्यान दुकानांवर दगडफेक, एक व्यक्ती ताब्यात
### आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी कारवाई होणार?

सोलापूर/प्रतिनिधी: सोलापुरात हिंदू जन आक्रोश मोर्चा वेळी झालेल्या तोडफोड प्रकरणी एका व्यक्ती पोलिसांनी ताब्यात घेतलंय. सध्या या तोडफोडप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाषणादरम्यान जर कोणी आक्षेपार्ह



वक्तव्य केलं असेल तर त्यांच्यावरही रितसर कारवाई केली जाईल अशी माहिती सूत्रांकडून मिळतेय. त्यामुळे आक्षेपार्ह वक्तव्याप्रकरणी भाजप आमदार नितेश राणे आणि टी. राजा सिंग यांच्यावर कारवाई होणार का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

सोलापुरात शनिवारी हिंदु जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आलं होतं. त्या निमित्ताने झालेल्या कार्यक्रमामध्ये भाजपचे आमदार नितेश राणे आणि तेलंगणातील भाजप आमदार टी राजा सिंह यांना आमंत्रित करण्यात आलं होतं. त्या दरम्यान सोलापुरात काही दुकानांवर दगडफेक करून तोडफोड करण्यात आल्याची घटना घडली होती. या घटनेमध्ये दुकानातील साहित्याचे नुकसान झाले असून एक व्यक्ती किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे.

सोलापुरात हिंदू जन आक्रोश मोर्चा वेळी झालेल्या तोडफोड प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. या घटनेमध्ये एका व्यक्तीला ताब्यातही घेण्यात आलं आहे. मोर्चाच्या वेळेस पोलिसांनी या परिसरात कॅमेरे लावलेले होते. त्यामुळे फुटेज पाहून आणखी आरोपी निश्रि्चत केले जाणार असल्याची पोलीस सूत्रांची माहिती आहे. दरम्यान, हिंदू जनआक्रोश मोर्चासाठी आमदार नितेश राणे आणि टी. राजा सिंग या दोघांनाही पोलिसांनी नोटीस बजावलेली होती अशी माहिती समोर येत आहे. भाषणादरम्यान जर कोणी आक्षेपर्ह वक्तव्य केलं असेल तर त्यांच्यावरही रीतसर कारवाई केली जाईल अशी पोलीस सूत्रांनी माहिती दिली.

सोलापुरातल्या वक्फ बोर्डाच्या जमिनीवरून टीका करताना भाजप आमदार नितेश राणे म्हणाले की, वक्फ कायदा हा केवळ आपल्या देशात आहे, असा कायदा कोणत्याही इतर समाजासाठी नाही, इतकंच काय कुठल्याही इस्लामिक देशात ही कायदा नाही. आपल्या देशात जेवढी जमीन रेल्वे आणि सैन्याची नाही तेवढी जमीन वक्फ बोर्डाने घेऊन ठेवली आहे. देशातील तिसऱ्या क्रमांकची जमीन कोणाकडे असेल तर ती वक्फची आहे. जिथे अशी जमीन वक्फची म्हणून मागायला येतील तिथे तुम्ही विरोध करून उभे राहिला तर राज्य आणि केंद्र सरकार तुमच्या मागे राहिल.

## नाही म्हणजे नाहीच, ओबीसीतून मराठ्यांना आरक्षण मिळणार नाही
### भुजबळांचा ओबीसी मेळाव्यात एल्गार



पंढरपूर : आज अन्याय करणारे बदलेल आहेत, ज्योतिबांनी जेव्हा शाळा काढण्याचं काम हाती घेतलं त्यांच्यासोबत अनेक ब्राम्हण देखील होते. त्यांना ब्राम्हणांनी मदत केली. काहीही झालं तरी आम्ही ओबीसीतून आरक्षण घेऊ देणार नाही. असं छगन भुजबळांनी म्हटलं ओबीसींच्या एल्गार मेळाव्यात म्हटलं. पंढरपुरात ओबीसी महाएल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी ओबीसी समाजातील महत्त्वाचे नेते व्यासपीठावर उपस्थित होते. हा पांडुरंग सगळ्याचा आहे. मी मागच्या वेळी देखील सगळ्या संतांची नावं वाचून । पान २ वर

## चिनी इलेक्ट्रिक वस्तू विकल्यास तुरुंगवासाच्या शिक्षेसह २ लाखांचा दंड

नवी दिल्ली : भारतात इलेक्ट्रिक वस्तूंच्या मार्केटमध्ये चिनी उत्पादनांची चलती आहे. अनेक निर्बंधानंतरही बाजारात निकृष्ट चिनी इलेक्ट्रिक उत्पादनांची विक्री काही केल्या थांबत नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे चिनी इलेक्ट्रिक वस्तू विकल्यास विक्रेत्याला तुरुंगवासाच्या शिक्षेसह २ लाखांचा दंड केला जाणार आहे. निकृष्ट दर्जाच्या साहित्यामुळे घरांमध्ये दररोज विद्युत अपघात होत आहेत. हे थांबवण्यासाठी सरकारने कडक नियम केले आहेत. आता कोणताही दुकानदार निकृष्ट मालाची विक्री करताना आढळल्यास किंवा कोणतीही कंपनी असे उत्पादन करताना आढळल्यास त्याच्यावर दंडासह तुरुंगवासाच्या शिक्षेची कारवाई करण्यात येणार आहे. भारत सरकारने 'स्विचसॉकेट-आउटलेट' आणि 'केबल ट्रंकिंग' सारख्या इलेक्ट्रिकल वस्तूंसाठी अनिवार्य गुणवत्ता मानके जारी केली आहेत. ज्यामुळे निकृष्ट वस्तूंच्या आयातीला आळा बसेल आणि देशांतर्गत अशा वस्तूंच्या उत्पादनाला चालना मिळेल, अशी आशा सरकारने व्यक्त केली आहे. या संदर्भात, उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाने इलेक्ट्रिकल ॲक्सेसरीज (गुणवत्ता नियंत्रण) आदेश जारी केला आहे.

## गिरीश महाजन यांनी आपल्या विरोधात रावेरमधून लोकसभेची निवडणूक लढवावी; एकनाथ खडसेंचे महाजनांना आव्हान

जळगाव : गिरीश महाजन हे सहा वेळा आमदार आहेत, आता त्यांनी आपल्या विरोधात रावेर लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढावी असं प्रतिआव्हान राष्ट्रवादीचे आमदार एकनाथ खडसे यांनी दिलं आहे. रावेर लोकसभा मतदारसंघात एकनाथ खडसे यांनी लोकसभेसाठी उभे राहून निवडून येऊन दाखवण्याचे आव्हान मंत्री गिरीश महाजन यांनी शुक्रवारी दिलं होतं, त्याला खडसे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. एकनाथ खडसे म्हणाले की, गिरीश महाजन तब्बल सहा टर्म आमदार राहिले आहेत. त्यांनी आता लोकसभा निवडणुकीपासून पळ न काढता आपल्या विरोधात रावेर लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवावी. गिरीश महाजन मला लोकसभेला उभे रहा आणि निवडून येऊन दाखवा असे म्हणतात, त्यांनी ते मला सांगण्याची गरज नाही. माझी उमेदवारी पक्षाचे नेते शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत



पाटील यांनी रावेर लोकसभा मतदारसंघातून जाहीर केली आहे. जर हा मतदारसंघ महाविकास आघाडीत राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाला तर आपण ही निवडणूक लढविण्यास तयार आहोत, आपणही पक्षाकडे इच्छा व्यक्त केलेली आहे. गिरीश महाजन यांनीही त्यांच्या पक्षातर्फे रावेरमधून आपल्याविरूद्ध निवडणुकीच्या मैदानात उतरावे.

गिरीश महाजनांची ईडी चौकशी करण्यात यावी अशी मागणी जामनेर येथील एका व्यापाऱ्याने केली आहे. मात्र त्यांची चौकशी केली जात नाही. माझ्यावर करण्यात आलेल्या आरोपावर मला राजीनामा देण्यास भाग पाडले, विविध । पान २ वर

## 'भारत जोडो न्याय यात्रा, न्याय का हक मिलने तक', काँग्रेसकडून लोगो जारी

मुंबई : काँग्रेसेच नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारत जोडो न्याय यात्रा सुरु होणार आहे. १४ जानेवारी रोजी मणिपूरमधून या यात्रेला सुरुवात होईल. त्याच पार्श्र्वभूमीवर काँग्रेसकडून शनिवार ६ डिसेंबर रोजी भारत जोडो न्याय यात्रेचा लोगो जारी करण्यात आला आहे. भारत जोडो न्याय यात्रा, न्याय का हक मिलने तक, असा नारा या लोगोद्वारे देण्यात आलाय. हा लोगोचे दोन भाग करण्यात आले आहेत. एका बाजूला भारत जोडो न्याय यात्रा हे तिरंग्याच्या रंगात लिहलं आहे. तर दुसऱ्या बाजूला न्याय का हक मिलने तक हा नारा निळ्या रंगात आहे.

या लोगो लॉन्च करण्याच्या कार्यक्रमावेळी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलं की, १४ जानेवारीपासून ही यात्रा सुरु होणार आहे. त्यांनी म्हटलं की राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली आम्ही १४ जानेवारीपासून भारत जोडो न्याय यात्रा सुरु करणार । पान २ वर

## 'एक देश-एक निवडणूक'वर जनेतचं मत जाणून घेणार

मुंबई : एक देश, एक निवडणूक यासंदर्भात राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या नेतृत्वाखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने विद्यमान कायदेशीर प्रशासकीय रचनेत योग्य बदल करण्याबाबत जनतेकडून सूचना मागवल्या आहेत.१५ जानेवारीपर्यंत आलेल्या सूचनांचा विचार केला जाईल, असे उच्चस्तरीय समितीने जारी केलेल्या नोटीसीमध्ये म्हटलं आहे. सूचना समितीच्या वेबसाइटवर किंवा ईमेलद्वारे पाठवल्या जाऊ शकतात, असे नोटीसमध्ये नमूद केले आहे.सध्या देशात एक देश एक निवडणूक करण्याच्या पार्श्र्वभूमीवर समिती नेमण्यात आलीये. तसेच संपूर्ण । पान २ वर



## अक्कलकोट तालुक्यातील पत्रकार बांधवांच्या रिपाइंच्या वतीने सत्कार

अक्कलकोट/प्रतिनिधी :अक्कलकोट तालुक्यातील पत्रकार बांधवांना रिपाइं आठवले गटाचे तालुकाध्यक्ष अविनाश मडिखांबे तसेच भाजपा अल्पसंख्याक नन्नू कोरबु यांच्या वतीने सर्व पत्रकार बांधवांचे सत्कार करण्यात आले. यावेळी बाबा निंबाळकर,शिवानंद फुलारी,अरविंद पाटील,मारुती बावडे, कमलाकर सोनकांबळे,प्रवीण देशमुख,विश्र्वनाथ चव्हाण,गौतम बाळशंकर, नंदकुमार जगदाळे,स्वामीराव गायकवाड,रमेश भंडारे,राजेश जगताप,बसवराज बिराजदार, रविकांत धनशेट्टी,गणेश भालेराव,शिवानंद याळवार,निंगराज निंबाळ,सचिन बनसोडे यावेळी रिपाइं आठवले गटाचे अविनाश मडिखांबे,भाजपा अल्पसंख्याक जिल्हा अध्यक्ष नन्नू कोरबु,जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,रासपाचे तालुका अध्यक्ष दत्ता माडकर, शहर अध्यक्ष अजय मुकणार, सलिम शेख,शकील नाईकवाडी,अश्पाक शेख,रशीद किस्तिक,अंबादास गायकवाड, राजु भगळे,आंदेवाडीचे सरपंच रमेश धोडमनी, सुरेश सोनकांबळे आदि उपस्थित होते. याप्रसंगी ता अध्यक्ष मडिखांबे यांनी सर्व पत्रकार बांधवाना पेटा बांधून त्याना पेन देऊन व केक कापून सत्कार करण्यात आले. यावेळी पत्रकार दिनानिमित्त तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांना अविनाश मडिखांबे यांनी शुभेच्छा देण्यात आले.

## मराठी रंगभूमीचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन कटिबद्ध : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

पुणे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. मराठी रंगभूमीचे प्रश्र्न सोडविण्यासाठी लवकरच बैठकीचे आयोजन करण्यात येईल तसेच वृद्ध कलावंतांचे मानधन वाढविण्यात येईल, असे प्रतिपादन यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले.मोरया गोसावी क्रीडा संकुल चिंचवड येथील आद्य नाटककार विष्णुदास भावे रंगमंचावर आयोजित या कार्यक्रमाला उद्योगमंत्री तथा नाट्य संमेलनाचे निमंत्रक उदय सामंत, ज्येष्ठ नेते तथा नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष खासदार शरद पवार, खासदार श्रीरंग बारणे, ९९ व्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी, नाट्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.जब्बार पटेल, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, नाट्य परिषदेच्या पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर आदी उपस्थित होते.मराठी माणसाच्या नाट्यप्रेमामुळे १०० वर्षे ही गौरवशाली परंपरा लाभली असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री म्हणाले की, देशात नाट्य कलेला २ हजार वर्षांची दीर्घ परंपरा लाभली




आहे. मराठी रंगभूमीची सुरुवात विष्णुदास भावे यांच्या सीता स्वयंवर नाटकाने झाल्यानंतर मराठी रंगभूमीने अनेक बदल पाहिले आहेत. अनेक थोर कलाकारांच्या योगदानातून मराठी रंगभूमी बहरली.नाटक रसिकांच्या पसंतीस उतरण्यासाठी आशय, विषय, सादरीकरण, नेपथ्य, संगीत याची चाकोरी मोडण्याची गरज असते, मराठी रंगभूमीने ते केल्याने या रंगभूमीचा उत्कर्ष होत आहे. आज समाजमाध्यमांच्या काळातही प्रेक्षक नाटकांना गर्दी करतात. व्यावसायिक सोबत प्रायोगिक रंगभूमीलाही चोखंदळ प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळतो आहे. हजारो कलाकार आणि पडद्यामागील कलावंतांनी यासाठी योगदान दिले आहे. गेल्या १०० वर्षात सुवर्णकाळ अनुभवताना अनेक अडचणींवर मात करीत रंगभूमी पुढे जात आहे. म्हणूनच या रंगभूमीचा आनंद सोहळा दिमाखात साजरा होत आहे, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

मराठी रंगभूमीच्या विकासासाठी प्रयत्नशील असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, १०० वे नाट्य संमेलन असल्याने नाट्य संमेलनासाठी ९ कोटी ८३ लाख आणि मुंबई येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहासाठी १० कोटींचा निधी देण्यात आला आहे. सांस्कृतिक कार्य विभागाकडून नवी नाट्यगृहे उभारण्यात येणार आहेत, मात्र हे करताना नाट्य कलावंतांच्या मागणीनुसार जुन्या नाट्यगृहाच्या दुरुस्तीसाठी नगरविकास विभागाच्या माध्यमातून कार्यवाही करण्यात येईल. मराठी नाट्य परिषदेसाठी मुंबईत भूखंड देण्याबाबत सहकार्य करण्यात येईल. पिंपरी -चिंचवड । पान २ वर

## संपादकीय

### धोकाही लक्षात घ्यायला हवा...

सध्या आयसीयूबाबत अशा प्रकारच्या कोणत्याही मार्गदर्शक सूचना प्रसारित करण्यात आल्या नव्हत्या. रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णाची जर इच्छा नसेल किंवा त्याच्या नातेवाइकांना जर वाटत नसेल तर कोणत्याही रुग्णाला अतिदक्षता विभागात दाखल करता येणार नाही, ही महत्त्वाची मार्गदर्शक सूचना करण्यात आली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारतातील आरोग्य सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यानंतर वैद्यकीय सेवेकडेसुध्दा व्यवसाय म्हणूनच पाहिले जाऊ लागले आहे. कोरोना काळात वैद्यकीय क्षेत्राचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. या भयंकर संकटात डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांनी केलेले कार्य विसरणे अशक्य आहे. मात्र, सध्या राज्यातील विविध रुग्णालयांकडून होणारी रुग्णांची लूट संतापजनकच होय. मोठमोठी हॉस्पिटल्स उभारली गेली आहेत आणि या हॉस्पिटल्समध्ये आयसीयू कक्षही उभारण्यात आले आहेत. साधारण जनरल वॉर्डमध्ये एखाद्या रुग्णाला जर दाखल केले असेल तर त्याला जेवढा खर्च येतो त्याच्या दहा ते पंधरा पट जास्त खर्च आयसीयूमध्ये दाखल झालेल्या रुग्णाला करावा लागतो. साहजिकच गेल्या काही वर्षांमध्ये अनेक रुग्णालयांमध्ये गरज नसतानासुध्दा एखाद्या र्वसाधारण रुग्णाला आयसीयूमध्ये दाखल करण्याच्या घटना घडल्याचे समोर येत आहे. केवळ एखाद्या रुग्णालयातील आयसीयू बेडस् रिकामे आहेत म्हणून एखाद्या किरकोळ रुग्णाला या आयसीयूमध्ये उपचारासाठी दाखल करण्याच्या प्रकारामध्येसुध्दा गेल्या काही वर्षांमध्ये वाढ झाली आहे. एखाद्या मोठ्या रुग्णालयातील आयसीयू बेड रिकामे असणे म्हणजे त्या रुग्णालयाच्या मार्केटिंग विभागाचे अपयश मानले जाते. एकीकडे रुग्णालयांचा असा कारभार सुरू जरी असला तरी अशा प्रकारे विनाकारण आयसीयू बेडवर रुग्णांची भरती केली जात असल्यामुळे खरोखरच एखाद्या गंभीर रुग्णाला अतिदक्षता उपचारांची गरज असेल तर त्याला अशा प्रकारे बेड उपलब्ध होत नाही ही बाब जास्त महत्त्वाची आहे. गेल्या काही वर्षांमध्ये किरकोळ आजारासाठीसुध्दा एखाद्या रुग्णाला अतिदक्षता विभागात पाठवण्याची जी पध्दत सुरू झाली आहे ती लक्षात आल्यानेच अशा प्रकारच्या मार्गदर्शक सूचना तयार कराव्या लागल्या आहेत. धोकाही लक्षात घ्यायला हवा.

## दर्पण : समाज प्रबोधनाची नवी दृष्टी

**सुप्रसिद्ध माध्यम तज्ज्ञ ए.ए. बेर्जर यांनी म्हटल्याप्रमाणे वृत्तपत्रांचा इतिहास हा जनतेचा आणि चळवळींचा इतिहास असतो. वृत्तपत्रे सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेला गती देतात. त्याद्वारे लोकांना सामाजिक संकेत, कार्यात्मक भूमिका आणि मूल्य याबाबतचे शिक्षण दिले जाते. त्यानुसार आचार्य बाळशास्त्री जांभेकरांनी केवळ लोककल्याण आणि लोकशिक्षण असाच उदात्त हेतू नजरेसमोर ठेऊन मुंबई येथे ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' या इंग्रजी आणि मराठी भाषेतील पाक्षिकाची सुरूवात करून मराठी वृत्तप**त्राची मुहूर्तमेढ रोवली. त्या घटनेचे स्मरण म्हणून राज्यात प्रतिवर्षी ६ जानेवारी रोजी 'दर्पण दिन' साजरा केला जातो, त्यानिमित्त हा लेख

१८३२ चा काळ, अर्थातच इंग्रजांच्या अधिपत्याचा काळ होता. राष्ट्रभक्तीसाठी समाजास प्रबोधनाची मोठी गरज होती. इंग्रजांच्या हातात आपले राष्ट्र असताना आपल्या मनात राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करुन, परिस्थितीची जाणीव करुन देण्यासाठी एखादे वृत्तपत्र असावे, असे बाळशास्त्रींना वाटले आणि त्यांनी दर्पण सुरु केले. भारतीय जनतेच्या आशा-अपेक्षांचे प्रतिबिंब आपल्या 'दर्पण' वृत्तपत्राच्या माध्यमातून तत्कालिन राज्यकर्त्यांना दिसावे आणि त्याचबरोबर परकीय राज्यकर्त्यांच्या कार्याची ओळख, त्याचे स्वरुप जनतेच्याही लक्षात यावे, असा दुहेरी संवाद दर्पणद्वारे बाळशास्त्रींनी साधला. थोडक्यात सरकार आणि जनता यातील दुवा म्हणून वृत्तपत्रांनी काम करावे या नितीतत्त्वाचे पालन दर्पणच्या माध्यमातून बाळशास्त्रींनी केले.



**दर्पणचे अंतरंग** दर्पण हे पहिल्या वर्षी जवळपास तीनशे-चारशे लोकांपर्यंत पोहोचले. त्याचे वर्गणीदार २८० होते. साधारणत: त्याकाळी एखादे वृत्तपत्र ५० लोक वाचत, असे समजले तरी एकूणच दर्पण जवळपास १२ ते १५ हजार वाचकांपर्यंत पोहोचत असे. 'दर्पण'मध्ये एकही जाहिरात त्यांनी छापली नाही. अगदी स्वत:चे पैसे टाकून जवळपास आठ वर्षे लोकांसाठी वृत्तपत्र सुरु ठेवले. भाऊ महाजन यांच्या सहकार्याने मराठी तर स्वत: इंग्रजी मजकूराची बाजू ते 'दर्पण'साठी सांभाळत. त्यामुळे 'दर्पण' मधील मजकूराचा दर्जा उच्च होता. दर्पण पाक्षिकात अर्धा मजकूर इंग्रजी तर अर्धा मराठी असे. तसेच डेमी आकाराची ८ पाने दोन कॉलम मजकूरासह यात असत. सरकार आणि जनता या दुहेरी संवादासाठी हा दोन द्विभाषिय मजकूर असे. दर्पणला त्यावेळी मोठी प्रतिष्ठा मिळाली. अगदी मुंबईत प्रसिध्द होत असलेल्या तत्कालिन इंग्रजी, गुजराथी, बंगाली भाषेतील वृत्तपत्रांमध्येही दर्पणमध्ये प्रसिध्द झालेली लेख, वृत्ते पुनर्प्रकाशित होत असत. २६ जून १८४० रोजी दर्पणचा शेवटचा अंक प्रकाशित झाला. पुढे बाळशास्त्रींनी दिग्दर्शन हे मासिकही सुरु केले.

**स्त्रीमुक्तीचे प्रणेते** दर्पणकार हे स्त्री-पुरुष समानतेचे पुरस्कर्ते होते. त्यांनी आपल्या दर्पण या पत्रातून मांडलेले स्त्रीमुक्तीविषयक विचार हे त्यांच्या प्रगमनशील सामाजिक सुधारणा विचाराचे प्रतीक होते. त्यांनी स्त्रीप्रथा बंदीचे स्वागत केले. तसेच विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. स्त्रियांची अवनती होण्याचे मुख्य कारण म्हणजे शिक्षणाचा अभाव हे होय, हे त्यांनी अचूकपणे ओळखले होते. तसेच सतीची चाल, बालविवाह, बालविधवा पुनर्विवाह, बालहत्या अशा सामाजिक प्रश्नासाठीही त्यांनी मोठे प्रयत्न केले. ६ जून १८३४ च्या दर्पणमध्ये दूराग्रही चालीवर झोड या मथळ्याचे पत्र लिहिले. त्यात स्त्री शिक्षणाचे विचार स्पष्टपणे मांडले. तर १८६७ मध्ये एका अंकात त्यांनी बालविधवांच्या समस्येवरही आपले विचार समर्थपणे मांडले आहेत. एकूणच त्यांच्या स्त्रीमुक्ती विचारांचा परामर्श घेतला असता आपल्याला त्यांच्या प्रगत सामाजिक विचारांचे यथार्थ ज्ञान होऊ शकते.

**पत्रकारिता : शैली व अभिव्यक्ती** आचार्य बाळशास्त्री जांभेकरांच्या वृत्तपत्रीय लेखनाची अभिव्यक्ती ही जिवंत आणि प्रवाही ठरते. त्यांच्या शैलीदार अभिव्यक्तीची विविध वैशिष्ट्ये आहेत. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण मध्ये सत्य आणि वस्तुनिष्ठतेवर भर दिला. त्यांच्या मते जे शुद्ध मनोरंजन इच्छितात त्यांचे समाधान दर्पण मधील लहान लहान गोष्टींमुळे होईल. सातारचे सती प्रकरण असो की, विधवा स्त्रियांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न असो अथवा जातिभेदाचा प्रश्न असो, आचार्य बाळशास्त्रींच्या लेखणीने तलवारीच्या पात्याचे रुप धारण करत परखड विवेचन केले. निर्भीड मतप्रतिपादन हा जांभेकरांच्या शैलीचा आणखी एक स्थायिभाव होता. पत्रकारितेचे श्रेष्ठ संकेत व मूल्ये जांभेकरांनी विचारपूर्वक जपले. जांभेकरांनी उपयुक्ततावादी आणि उदारमतवादी दृष्टीकोनातून स्वतंत्रपणे विचार मांडले आणि प्रगत विलायती समाजातील नव्या कल्पना स्वभाषेतून आपल्या वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातील इंग्रजी अमलातील ज्ञानाचा नवा प्रकाश म्हणजे बाळशास्त्री जांभेकर. इंग्रजी राजवटीच्या सुरुवातीच्या काळातील एक उच्चविद्याविभूषित, पंडिती व्यक्तिमत्व म्हणजे आचार्य बाळशास्त्री जांभेकर होत. भारतातील पहिले प्रोफेसर म्हणजे प्रपाठक होण्याचा बहुमान १८३४ यावर्षी बाळशास्त्रींना मिळाला. शिक्षण विभागाचे संचालक झाले. तसेच त्यांनी विविध विषयांवर ग्रंथ लिहिले. यात प्रामुख्याने भूगोल, इतिहास, भौतिकशास्त्र, गणित,खगोलविद्या, मानसशास्त्र आदी विषयांचा समावेश आहे. याचबरोबर त्यांनी बालव्याकरण, भूगोलविद्या, सारसंग्रह आणि नीतीकथा हे चार ग्रंथही लिहिले आहेत. एलिफिन्स्टनकृत हिंदुस्थानाच्या आधारे त्यांनी इतिहास रचला. हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास हा ग्रंथ १८५१ यावर्षी त्यांच्या निधनानंतर प्रसिद्ध झाला. त्यांच्या रचनात्मक कार्यामुळे महाराष्ट्रात सार्वजनिक जीवनाला एक नवे वळण लाभले. त्यांच्या या महत कार्यामुळे मराठीतील आद्यसंपादक होण्याचा बहुमान बाळशास्त्रींना मिळाला.

१९२ वर्षापूर्वी आचार्य बाळशास्त्रींनी दर्पणच्या रुपाने जो समाज प्रबोधनाचा वृक्ष लावला तो आज प्रचंड वाढला आहे. महाराष्ट्रात वृत्तपत्र क्षेत्रात झालेली अभूतपूर्व क्रांती ही त्याचाच प्रत्यय आहे. आचार्य बाळशास्त्रींच्या या महान कार्यास शतश: प्रणाम

**-डॉ.राजू पाटोदकर,**
**उपसंचालक (माहिती), पुणे विभाग, पुणे**

**पान १ वरुन**

### अभिमानास्पद..! इस्त्रोची

सूर्याचा अभ्यास सुरू करेल. या दरम्यान, आदित्यवरील सर्व उपकरणे सुरळीतपणे सुरू आहेत की नाही, याची चाचणीदेखील इस्रोकडून करण्यात येणार आहे. आदित्य L-1 मध्ये विशेष यंत्रणा तयार करण्यात आली आहे, जेणेकरुन कोणत्याही परिस्थितीत यान सूर्याच्या कक्षात टिकू शकेल. आदित्य L-1 ची रचना खास प्रकारे करण्यात आली आहे, ते सूर्याच्या फार जवळ जाणार नाही, पण लॅरेंज पॉईंटवर राहील आणि सूर्यावर संशोधन करेल. आदित्य L-1 ही एक प्रकारे स्पेस टेलिस्कोप आहे, जी स्पेसमध्ये खास पद्धतीने काम करेल.

इटालियन-फ्रेंच गणितज्ञ जोसेफ लुई लॅग्रेंज यांच्या नावावरून लॅग्रेंज पॉईंट्सची नावे आहेत. सूर्य आणि पृथ्वीच्यामध्ये पाच लॅग्रेंज पॉईंट आहेत. यातील L1 वर हे यान पाठवण्यात आलं आहे. पृथ्वीपासून L1 चे अंतर सुमारे १.५ दशलक्ष म्हणजेच १५ लाख किलोमीटर आहे. म्हणजेच आदित्य-एल१ पृथ्वीपासून तब्बल १५ लाख किलोमीटर दूर पाठवण्यात आलंय.

### गिरीश महाजन यांनी आपल्या..

चौकशा लावल्या. आजही लावल्या जात आहे. माझ्या संपत्तीची सरकारने ईडी, सीबीआय चौकशी केली. माझ्या पत्नीची, मुलीची चौकशी केली. माझ्या जावयाला अटक केली. आजही मला त्रास दिला जात आहे. परंतु माझ्याविरूद्ध काहीही सापडलेले नाही. माझ्याप्रमाणे गिरीश महाजन यांचीही चौकशी करा. जामनेर येथील एका व्यापाऱ्याने महाजन यांची ईडीकडे तक्रार केली आहे. ती प्रलंबित आहे. त्या आधारावर चौकशी करावी, त्यांच्याकडे आज जी संपत्ती आली आहे, ती कशी आली याची एकदा चौकशी करावी.

एकनाथ खडसे म्हणाले की, रावेर मतदार संघातून भारतीय जनता पक्षाने खासदार रक्षा खडसे यांना उमेदवारी दिली आणि महाविकास आघाडीमधून आपल्याला राष्ट्रवादीने उमेदवारी दिली आपण रक्षा खडसे यांच्या विरोधात लढणार आहोत. कारण त्यांचा पक्ष वेगळा आहे, माझा पक्ष वेगळा आहे. पक्ष म्हणून मी त्यांना मदत केलेली नाही, त्यांनीही कधी मला मदत केलेली नाही.त्यामुळे मी त्यांच्या विरूद्ध लढणार आहे. मलाही माझं सरकार पाहिजे आहे, माझ्या चौकशा कमी होतील.

भाजपचे नेते विनोद तावडे ह् जुन्या भाजप नेत्यांना पक्षात जवळ करत असल्याची चर्चा आहे. आपण पुन्हा भाजपमध्ये जाणार काय? याबाबत बोलताना एकनाथ खडसे म्हणाले की, विनोद तावडे लोकसभेत भाजप उमेदवारांचा विजय व्हावा यासाठी पक्ष भक्कम करीत आहे, हे निश्चित आहे. त्यांचे आपले संबधही चांगले आहेत. परंतु आपला भाजपने प्रचंड छळ केला आहे, माझ्या चौकशा लावल्या. मला पक्षातून बाहेर जाण्यास भाग पाडले. आजही मला त्रास दिला जात आहे. आपला विविध चौकशा लावून छळ केला जात आहे. त्यामुळे आपला भाजपमध्ये घरवापसी करण्याचा कोणताही विचार नाही.

### 'भारत जोडो न्याय यात्रा, न्याय

आहोत. देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि मूलभूत प्रश्नांवर भाष्य करण्यासाठी भारत जोडो न्याय यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. काँग्रेसने आपल्या अधिकृत ट्विटर अकाऊंटवरुन याविषयी माहिती दिली. या ट्विटमध्ये काँग्रेसने म्हटलं की, 'भारत जोडो न्याय यात्रा'चा लोगो लॉन्च करण्यात आलाय. 'भारत जोडो न्याय यात्रा' हे देशवासीयांना आर्थिक, सामाजिक आणि राजकीय न्याय मिळवून देण्यासाठी एक मजबूत पाऊल आहे.

खरगे यांनी सांगितले की, काँग्रेसचा हा प्रवास हिंसाचारग्रस्त मणिपूरची राजधानी इंफाळपासून सुरू होईल. या पदयात्रेचा एकूण मार्ग ६७०० किलोमीटरचा असेल. हा ६६ दिवसांचा प्रवास असेल आणि राहुल गांधी त्यांना दिवसातून दोनदा संबोधित करतील, असं त्यांनी म्हटलं.

पंतप्रधान मोदींवर निशाणा साधत खरगे म्हणाले, 'मणिपूरमध्ये दुर्दैवी घटना घडल्या आणि घडत आहेत. पण रात्रंदिवस मोदीजी कधी समुद्रात जाऊन किंवा पोहायला जाऊन फोटो सेशन्स करतात, कधी मंदिरे बांधतात, तिथे जाऊन फोटो काढतात, कधी केरळमध्ये जाऊन फोटो काढतात तर कधी मुंबईत जाऊन फोटो काढतात.

मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, हा प्रवास मणिपूर, इम्फाळ येथून सुरू होणार असून नागालँड, आसाम आणि अरुणाचलसह देशातील १५ राज्यांमधून जाणार असून शेवटी मुंबईत पोहोचणार आहे. ११० जिल्ह्यांतून जाणारी ही यात्रा लोकसभेच्या १०० आणि विधानसभेच्या ३३७ जागांचा समावेश करेल. सुमारे ६७०० किलोमीटरचे अंतर पार करुन मुंबईत या यात्रेचा शेवट होणार आहे. देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि मूलभूत प्रश्नांवर 'भारत जोडो न्याय यात्रा' काढण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

### मराठी रंगभूमीचे प्रश्न सोडविण्यासाठी

महानगरपालिकेच्या नाट्यगृहात पूर्वीप्रमाणे विजेचा खर्च आकारला जाईल. ज्येष्ठ कलावंतांच्या घराबाबतही शासन सकारात्मक आहे. नाट्यसृष्टीच्या उत्कर्षासाठी एकत्रित प्रयत्न करताना मराठी रंगभूमीसाठी शासनाकडून सर्व प्रकारचे सहकार्य करण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी दिली.

चिंचवडच्या पावन भूमीत नाट्य संमेलन होत असल्याबाबत आनंद व्यक्त करून ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार म्हणाले की, सर्व कलांचा संगम असलेली रंगभूमी सर्वाधिक परिणामकारक माध्यम आहे. नाट्याचा मुख्य उद्देश मनोरंजन असल्याचे भरतमुनी यांनी म्हटले आहे, मात्र नाटकाच्या माध्यमातून प्रबोधन आणि ज्ञानदानाचे कार्य उत्तमरीतीने होते. रंगभूमीच्या माध्यमातून अनेक वर्षे लोकप्रबोधनाचे कार्य होत आहे. मराठी नाट्यसृष्टीद्वारे नवे विषय मांडले जात आहेत. नाट्य रसिकांना नाटकांकडे आकर्षित करणारी नाटके रंगभूमीवर यावीत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. नाट्य संमेलनाच्या निमित्ताने राज्याच्या विविध भागात कार्यक्रमांचे आयोजन होणार असल्याने नाट्यरसिकांना ही मोठी पर्वणी आहे, असेही श्री.पवार म्हणाले.

उद्योगमंत्री श्री.सामंत म्हणाले की, पिंपरी चिंचवड येथे नाट्य संमेलनाचा निर्णय एकमताने घेण्यात आला. या नाट्य संमेलनानंतर कलाकार आणि पडद्यामागील कलावंतांचे प्रश्न सोडविण्यासाठी बैठकीचे आयोजन व्हावे आणि ज्येष्ठ कलाकारांच्या वृद्धाश्रमासाठी शासनाने निधी द्यावा,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शासनातर्फे नाट्य संमेलनासाठी प्राप्त निधीचा उपयोग कलाकार आणि पडद्यामागील कलावंतांना मानधन आणि आरोग्य विमा काढण्यासाठी करण्यात येईल, असेही श्री. सामंत म्हणाले.नाट्य संमेलनाध्यक्ष जब्बार पटेल म्हणाले की, मराठी रंगभूमी प्रगल्भ आणि विविधतेने नटलेली आहे. नाट्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून रंगभूमीचा अधिक विकास होईल. देशपातळीवरील उत्तम कलाकारांच्या माध्यमातून विद्यापीठातून नाट्यकलेचे प्रशिक्षण आणि संशोधन व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.जगात सुंदरता निर्माण करण्यासाठी कलावंतांनी एकत्रित प्रयत्न करावा, असे मावळते संमेलनाध्यक्ष श्री. गज्वी म्हणाले.

प्रशांत दामले यांनी देखील यावेळी विचार व्यक्त केले. नाट्य संमेलन हे कलावंतांसाठी दिवाळी असून एकत्रित विचार करण्याची उत्तम जागा आहे, असे श्री. दामले म्हणाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विश्र्वस्त अजित भुरे यांनी केले. श्री.भोईर यांनी स्वागतपर भाषणात नाट्य संमेलनाच्या आयोजनात सहकार्य करणाऱ्या सर्वांना धन्यवाद दिले.यावेळी वामन पंडित संपादीत 'रंगवाचा' या नियतकालिकाचे आणि १०० मराठी नाट्य संमेलनाच्या निमित्ताने पिंपरी चिंचवड शाखेतर्फे तयार करण्यात आलेल्या 'नांदी' या स्मरणिकेचे प्रकाशन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते, तर प्रेमानंद गज्वी यांचे आत्मकथन 'रंग निरंतर'चे प्रकाशन ज्येष्ठ नेते पवार यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाच्या सुरुवातीस दीपप्रज्वलन आणि घंटेचे पूजन करून १०० व्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. ज्येष्ठ नेते तथा नाट्य परिषदेचे विश्र्वस्त शरद पवार यांच्या हस्ते रंगमंचाच्या पडद्याचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमाला आमदार उमा खापरे, अण्णा बनसोडे, अश्र्विनी जगताप, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, नाट्य परिषदेचे सर्व विश्र्वस्त, कृष्णकुमार गोयल, पी.डी. पाटील, नाट्य कलावंत आणि नाट्य रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नाही म्हणजे नाहीच, ओबीसीतून..

दाखवली होती. या सगळ्या संतांचं म्हणणं एकच आहे. सगळे एकत्र येऊ. निवडणूक आली की सगळ्या पक्षांचे नेते पांडुरंगाचं दर्शन घ्यायला जातात. तेव्हा त्यांना अडवलं जात नाही. मग आरक्षणाच्या वेळेसच का अडवलं जातं, असा सवाल भुजबळांनी यावेळी उपस्थित केला.

ओबीसी समाजातून मराठा समाजाला आरक्षण मिळणार नाही म्हणजे नाही. आरक्षण स्वतंत्र्य घ्या. ओबीसीमधून आरक्षण तुम्हाला मिळणार नाही, असं देखील भुजबळांनी म्हटलं. आमचा मराठा आरक्षणाला आणि मराठा समाजालाही विरोध नाही. पण आरक्षणाखाली जी झुंडशाही सुरु आहे, त्याला आमचा विरोध आहे, असं भुजबळांनी म्हटलं. शिवरायांच्या नावावरुन आम्हाला बोललं जातं. पण लक्षात ठेवा छत्रपतींची मराठा सेना नव्हती ती मावळसेना होती. छत्रपतींची समाधी ही महात्मा फुलेंनी शोधून काढली. पहिली शिवजयंती फुलेंनी सुरु केली. पहिला पोवाडा फुलेंनी सुरु केला. शिवाजी महाराजांचं नाव घेता आणि आमच्यावर हल्ले करता असा सवाल देखील भुजबळांनी यावेळी उपस्थित केला. यांची २०० पोरं गाड्या घेऊन मुंबईत गेलीत कुठल्या मैदानावर उपोषण करायचं ते पाहण्यासाठी. सारखं आमची पोरं गरीब असं म्हटलं जातं. पण आरक्षण हे गरिबी आणि श्रीमंतीवर नाही.

हे आरक्षण ज्या समाजाला काही मिळत नाही त्यांच्यासाठी नाही. त्यामुळे आरक्षण हे तुम्हाला तुम्ही श्रीमंत आहात याच्यावर नाही, तुम्ही सामाजिक दृष्ट्या किती मागलेले आहात याच्यावर अवलंबून आहे.

मंत्रालयातही ५४ टक्के मराठा समाजाची माणसं आहे, असं म्हणत भुजबळांनी मनोज जरांगे यांच्यावर थेट वार केला. भुजबळांना मंत्रिपदाची पर्वा नाही. मंत्रिमंडळातही मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसमोर जे बोलायचं ते बोललोय मी. त्यामुळे मतांकडे पाहून तुम्ही भाषणं करु नका मतं आमच्याकडेही आहेत. आम्ही विकास करण्यासाठी आकाश पाताळ एक करु, असं भुजबळांनी म्हटलं.

### 'एक देश-एक निवडणूक'वर जनेतचं..

देशात एकाच वेळी निवडणुका घेण्याच्या विचारात केंद्र सरकार असून त्याच पार्श्र्वभूमीवर पावलं देखील उचलली जातायत. त्यामुळे यावर केंद्र सरकार नेमका कोणता निर्णय घेणार हे पाहणं जास्त महत्त्वाचं ठरणार आहे.

गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये ही समिती स्थापन करण्यात आली होती आणि तेव्हापासून आतापर्यंत दोन बैठका झाल्या आहेत. अलीकडेच, समितीने राजकीय पक्षांना पत्रे लिहून देशात एकाचवेळी निवडणुका घेण्याबाबत त्यांचे मत मागवले होते. ही पत्रे सहा राष्ट्रीय पक्ष, २२ प्रादेशिक पक्ष आणि सात नोंदणीकृत अपरिचित पक्षांना पाठवण्यात आली होती. समितीने एकाचवेळी निवडणुका घेण्याबाबत कायदा आयोगाचे मतही ऐकले. या मुद्द्यावर विधी आयोगाला पुन्हा बोलावले जाऊ शकते.

संदर्भाच्या अटींनुसार, भारतीय संविधान आणि इतर वैधानिक तरतुदींच्या अंतर्गत विद्यमान चौकट लक्षात घेऊन लोकसभा, राज्य विधानसभा, नगरपालिका आणि पंचायतींच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यासाठी शिफारसी करणे हे समितीचे उद्दिष्ट आहे. यासाठी संविधान, लोकप्रतिनिधी कायदा, १९५०, लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ आणि एकाचवेळी निवडणुका घेण्यासाठी आवश्यक असणारे नियम आणि इतर कायदे यामध्ये विशेष सुधारणा करण्याची शिफारस करण्याचा उद्देश आहे.

## निवडणुकीच्या कामात कसूर, मालेगावमध्ये १४ बीएलओंवर गुन्हा दाखल

मालेगाव : निवडणूक कामात कसूर केल्याच्या आरोपावरून मालेगाव बाह्य मतदारसंघात कामकाज करणाऱ्या १४ बीएलओंवर छावणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर मतदारयाद्यांचे शुद्धीकरण, दुबार नावे, फोटो वगळणे आदी कामकाज सुरु आहे. मतदान प्रक्रियेशी निगडित कामे प्रथम प्राधान्याने करणे अपेक्षित असताना १४ बीएलओंनी संबंधित कामकाज पूर्ण केले नाही. तसेच आढावा बैठकांना सातत्याने गैरहजर राहून कामाकडे दुर्लक्ष केले. निवडणूक कामकाजासंदर्भात संबंधितांनी नोटीस बजावून देखील या १४ बीएलओंनी प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्याऐवजी दुसऱ्या बीएलओंची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती तहसीलदार नितीनकुमार देवरे यांनी यांनी दिली आहे.

मालेगाव बाह्य मतदारसंघात एकूण ३३१ बुथस्तरावर बीएलओंची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदान प्रक्रियेशी निगडित कामे प्रथम प्राधान्याने करणे अपेक्षित आहे. १४ बीएलओंनी मतदारयादीशी संबंधित कामकाज व घरोघरी जाऊन मतदारांची पडताळणी केली नाही. त्यांना वारंवार सूचना देण्यात आल्या. त्यानंतर नोटीसही बजावल्या होत्या. त्यालाही त्यांनी दाद न देत कामात कसूर करण्याचे धोरण कायम ठेवल्याने त्यांच्याविरुद्ध लोकप्रतिनिधित्व कायदा १९५० चे कलम ३२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निवडणुकीच्या कामात प्रत्येक कर्मचाऱ्याने जबाबदारीने आपले कर्तव्य पूर्ण करणे गरजेचे आहे. कामात कसूर करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असे तहसीलदार तथा मालेगाव बाह्यचे सहायक मतदार नोंदणी अधिकारी देवरे यांनी सांगितले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# यशवंत सेनेच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप



कळंब/प्रतिनिधी : महाराजा यशवंतराव होळकर यांच्या राज्य अभिषेक दिन व यशवंत सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष, माजी राज्यमंत्री, श्री.बालासाहेब दोडतले यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मुकबधीर निवासी विद्यालय कळंब व पालवर राहणाऱ्या बांधवांना फळांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ दादाराव गुंडरे यांनी यशवंतराव होळकर यांचा इतिहास उपस्थितांना सांगितला. तर पुढे या कार्यक्रमाला सुभाष मैदाड ,दिपक हारकर, बंडु लांडगे,अक्षय शेंडगे, पत्रकार दत्ता गायके, बाळासाहेब दुगाने, सचिन हारकर,डॉ दादाराव गुंडरे, दिगांबर कस्पटे, नेताजी हारकर, अनिल शिंपले, अक्षय भंडारे , करण गायके, सतिश वैद्य,अमोल मैदाड,डॉ अशोक शिंपले ,संतोष घाटूळे , आश्रूबा कोठावळे, गोरख कोळी,महादेव हाजगुडे, यांच्या सह शाळेतील विद्यार्थी , शिक्षक, शिक्षकेत्तर, कर्मचारी उपस्थित होते . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ अशोक शिंपले यांनी केले. तर आभार शाळेचे शिक्षक आश्रुबा कोठावळे यांनी मानले.

# वसंत मुंडेंचा वृत्तपत्रांच्या अर्थकारणाचा अजेंडा विधानसभेत मांडणार

## आ.संदीप क्षीरसागर यांनी दर्पणदिनी ग्वाही * बीड ही वृत्तपत्रांची पंढरी: प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे




**या दिग्गज बीडकरांचा झाला दर्पण दिनी गौरव**

**दर्पण दिनानिमित्त बाळशास्त्री जांभेकर बीडचे दर्पणकार या नामांकित पुरस्काराने बीडचे भूषण म्हणून पश्चिम भारताचे पीटीआय प्रमुख विलास तोकले, मराठी दर्पणकार म्हणून सुराज्यचे संपादक सर्वोत्तम गावस्कर, उर्दू दर्पणकार दैनिक तामिरचे संपादक मकदूम काझी, इंग्रजी दर्पणकार म्हणून लोकमत टाइम्सचे जिल्हा प्रतिनिधी सी. आर. पटेल, हिंदी दर्पणकार दैनिक लोकमतचे उपसंपादक अनिल भंडारी, इलेक्ट्रॉनिक मीडिया दर्पणकार म्हणून टीव्ही ९ चे महेंद्र मुधोळकर, न्यूजपोर्टल सोशल मीडिया दर्पणकार संग्राम धनवे, युट्युब सोशल मीडिया दर्पणकार संतोष ढाकणे आणि अब्दुल कलाम वैचारिकदूत पुरस्काराचे मानकरी आष्टी येथील ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते भीमराव गुरव या दिग्गज बीडकरांचा यथोचित सन्मान करण्यात आला.**

बीड/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे हे वृत्तपत्रांचे अर्थकारण पोटतिडकिने मांडत आहेत. छोटी वृत्तपत्रे आणि पत्रकारांचे प्रश्नांच्या

अर्थकारणाचा अजेंडा विधानसभेत मांडणार असल्याची ग्वाही बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी दिली.तर बीडच्या पत्रकारितेने राज्यात आपली वेगळी ओळख निर्माण केली असून बीड ही खऱ्या अर्थाने वृत्तपत्रांची पंढरी आहे, स्थानिक वृत्तपत्र लोकांची प्रश्न्न लोकांच्या भाषेत मांडतात त्यामुळे वृत्तपत्रांना लोकाश्रय असल्याने ते टिकून आहेत.अशा शब्दांत कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी बीडच्या पत्रकारितेचा गौरव केला. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईच्या बीड जिल्हा शाखेच्या वतीने शनिवार, ६ जानेवारी २०२४ रोजी दर्पण दिनानिमित्त बीड येथील स.मा.गर्गे भवन येथे कर्तृत्ववान पत्रकारांचा गौरव करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्याला बीडचे आमदार संदीप क्षीरसागर, माजी आमदार उषाताई दराडे, उपविभागीय अधिकारी करिष्मा नायर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, संपादक संतोष मानूरकर आदींची उपस्थिती होती.

आमदार संदीप क्षीरसागर म्हणाले, बीडची पत्रकारिता निर्भीड असून ती डोळ्यात अंजन घालणारी आहे. वृत्तपत्रांचे अर्थकारण आणि पत्रकारांच्या इतर मागण्या तडीस नेण्यासाठी विधानसभेत आवाज उठवू अशी ग्वाही त्यांनी दिली दिली. अध्यक्षीय भाषणात प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले, बीडच्या प्रगल्भ पत्रकारितेला मोठा वारसा आहे. बीडच्या पत्रकारितेला केवळ लोकाश्रय असल्यामुळेच ती निर्भीड झाली आहे, बीड ही खऱ्या अर्थाने वृत्तपत्रांची पंढरी आहे. स्थानिक वर्तमानपत्र आणि काम करणाऱ्या संपादक पत्रकारांचे वेगवेगळे वैशिष्ट्य आहेत. इथली वर्तमानपत्र लोकांचे प्रश्न्न लोकांच्या भाषेत मांडतात इथं कोणतीही बातमी विषय जपला जाऊ शकत नाही त्यामुळे वर्तमानपत्रांना लोकाश्रय आहे असे मत व्यक्त केले.

तर वृत्तपत्रात येणार्या सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बातम्यांकडे प्रशासन म्हणून आम्ही बारकाने लक्ष ठेवतो, त्यामुळे सर्वसामान्यांना न्याय मिळण्यासाठी वृत्तपत्र हे प्रमुख माध्यम ठरते, असे उपविभागीय अधिकारी करिष्मा नायर यांनी सांगितले.

प्रस्ताविक संपादक संतोष मानुरकर तर सुत्रसंचालन पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी यांनी केले. सर्वोत्तम गावस्कर, नरेंद्र कांकरिया, विलास तोकले, काझी मगदूम, आर्दीनीही आपले मनोगत मांडले. या शानदार पुरस्कार सोहळयास आणि दर्पण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार अशोक देशमुख, सुर्योदयचे संपादक गंगाधर काळकुटे, आरोग्यदूतचे संपादक बाबा श्रीहरी देशमाने, पत्रकार संघाचे पदाधिकाऱ्यांसह बीड जिल्ह्यातील पत्रकार बांधव,भगिनी, नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती व ओंकार स्वयंसहाय्य महिला बचत गट वर्धापन दिन साजरा



अक्कलकोट/प्रतिनिधीः क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती व संजय नगर येथील ओंकार स्वयंसहाय्य महिला बचत गटाचा वर्धापन दिन साजरा करण्यात आली.प्रारंभी या कार्यक्रमात सखी शहरस्थर संघाचे अध्यक्ष उत्तरा जाधव ,अध्यक्ष सुर्वणा इंगळे , सचिव प्रणिता जगताप यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . यावेळी प्रमुख पाहुणे उत्तरा जाधव यांनी ओंकार स्वयंसहाय्य महिला बचत गटाच्या वर्धापन दिन निमित्त त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिले . सर्व बचत गटातील पदाधिकारी व सदस्याच्या हस्ते केक कापून वर्धापन दिन साजरा केला. यावेळी सदस्य अंजली इंगळे , सुनिता इंगळे , सरोज जगताप , अनिता डोके, सखुबाई घाटे , लक्ष्मीबाई भत्ता , अश्र्विनी सागरे , साखरबाई जमादार आदी उपस्थित होते

# सैनिक टाकळीतील विविध विकास कामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न

सैनिक टाकळी : शिरोळ तालुक्यातील सैनिक टाकळी येथील विविध विकास कामे मार्गी लागण्यासाठी तसेच माजी सैनिकांचा घरफाळा माफीचा निर्णय सरकारने घेतला होता. या सर्व कामांची पूर्तता करण्यासाठी सैनिक टाकळीतील माझी उपसरपंच संतोष गायकवाड व श्रीधर भोसले यांनी अजित दादा पवार साहेबांना भेटून विकास कामे मार्गी लागण्यासाठी विनंती केली. तसेच या कामासाठी लागणारी कागदपत्रे पूर्तता केली. या विविध विकास कामासाठी अनुदान मिळणे बाबत ग्राम विकास आणि पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांना पण विनंती केली.



# अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

पंढरपूर/प्रतिनिधीः राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवर पदाधिकारी यांच्यासह मंदिर समितीचे कर्मचारी उपस्थित होते




# उल्हासनगर महानगरपालिका महाराष्ट्र शासनाची महाराष्ट्र मुद्रा योजना २०२३ जाहीर

उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे : महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना २०२३ जाहिर केली असून, नागरिकांना मुद्रांक शुल्क ब दरामध्ये सवलत वा माफी मिळणेसाठी दि. ०३/०१/२०१४ रोजी महापलिका सभागृहात सदर योजना सामान्य नागरिक ापयंत पोहचर्चाविण्यासाठी नगररचना विभागामार्फत एक कार्यशाळा आयोजित करण्यात आले. यावेळी मुद्रांक शुल्क विभागाचे श्री. ओमप्रकाश जांभळे, सह जिल्हा प्रबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे (ग्रामीण) यांनी मार्गदर्शन केले व नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नांचे निरसन केले, सदर कार्यशाळेस मा. प्रशासक तथा आयुक्त, श्री. अजीज शेख, नगररचना विभागाचे सहाय्यक संचालक श्री. ललित खोब्रागडे, विकासक, बॉन्ड रायटर, एनजीओं, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, व्यापारी, संबंधित अधिकारी कर्मचारी, व नागरिक उपस्थित होते.

नागरिकांनी सदर योजना व्यवस्थित समजण्यासाठी उल्हासनगर मध्ये एक काऊंटर सुरू करावे, अशी मागणी केली, त्यासाठी श्री. जांभळे यांनी प्रतिसाद देवून पूढील आठवडयात तात्काळ एक काऊंटर सुरू करण्याचे आश्र्वासीत केले, उल्हासनगर मधील अनाधिकृत नियमोतीकरणाचे लक्ष ध्यानात घेता, अभय योजनेची आवश्यकता उल्हासनगर शहराला मोठ्या प्रमाणात आहे असेही त्यांनी स्पष्ट केले, अभय योजनेकरिता आवश्यक कागदपत्रांपैकी त्या वेळेसचा एक जरी पुरावा असला तरी अभय योजना लागू करू असेही श्री. जांभळे यांनी स्पष्ट केले,

यामुळे नागरीकांमध्ये असलेला संभ्रम दूर झाला व या योजनेचा लाभ मोठ्या प्रमाणात नागरीकांना होण्याची आशा निर्माण झाली.सदर योजना मुद्रांक विभागाची जरी असली तरी प्रशासक तथा आयुक्त म्हणून नागरिकांना सुविधा कशी पुरविता येईल. याचा विचार करून ही कार्यशाळा आयोजित केल्याचे श्री, अजीज शेख, प्रशासक तथा आयुक्त यांनी प्रतिपादीत केले. सदर अभय योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेणेबाबत नागरिकांना आवाहन केले,

# जुनी सावरट येथे बालिका दिन व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

नवापूरः ३ जानेवारी २०२४ रोजी हवाई सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने व



कोळदा केंद्रातील प्राथमिक शाळा जुनी सावरट येथे यांच्या वतीने संयुक्त विद्यमाने बालिका दिन व सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. सावित्रीबाई फुले यांचा इतिहास वाचणे काळची गरज आहे. आपल्याला सर्वांना शिक्षण मिळावे म्हणून खुप त्याग सहन केला आहे. म्हणुन सावित्रीबाई फुले यांनी आपल्या पदरात ज्ञानाची शिदोरी टाकली आहे. आणि ते ज्ञान घेऊन आपण प्रगती करणार आहोत

देशाचा विकास करणार आहोत असे यावेळी हवाई सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा दर्शना वसावे यांनी बोलतांना सांगितले. तर सावित्रीबाई फुले यांच्या आठवणींना मुख्याध्यापिका सुषमा गावित, सहशिक्षिका रजिता कापडनिस यांनी उजाळा दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी पाटीवर वर मी सावित्री असे लिहून शिक्षणाचा सामाजिक संदेश दिला. यावेळी हवाई सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा दर्शना वसावे , मुख्याध्यापिका सुषमा गावित, सहशिक्षिका रजिता कापडनिस, अमिता वसावे, संस्था समन्वयक प्रफुल्ल वसावे विद्यार्थी तर आदी उपस्थित होते

# इटकुर येथे पत्रकार दिनाच्या निमित्ताने पत्रकार बांधवांचा सत्कार



कळंब/ सुधाकर रणदिवे :दर्पण दिनाच्या निमित्ताने ग्राप .सदस्य सौ.कविता प्रदिप फरताडे व प्रदिप फरताडे यांच्या संयोजनातुन ग्राम पंचायतच्या वतीने ग्रामिण पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.यावेळी उपस्थित दै . लोकमत कळंब तालुका प्रतिनिधी बालाजी आडसुळ , दैनिक, साप्ताहिक , पोर्टल , युट्युब चॅनल देशभक्त चे संपादक लक्ष्मण शिंदे , धाराशिव नमस्ते युट्युब चॅनलचे संपादक, संदिप कोकाटे , साप्ताहिक कलायोग चे संपादक शरद आडसुळ , दैनिक यश सिद्धी न्यूज चे धाराशिव जिल्हा प्रतिनिधी सुधाकर रणदिवे , टिवेंन्टीफोर न्युज चे धाराशिव जिल्हा प्रतिनिधी अमोल रणदिवे , दैनिक लोकमत ईटकूर प्रतिनिधी अजित गायके , एकमतचे ईटकूर प्रतिनिधी बालाजी देसाई , नमस्ते धाराशिव चे ईटकूर प्रतिनिधी राजकुमार आडसुळ , छाया चित्रकार, रवी गवारे आदिंचा सत्कार करण्यात आला. यावेळी गुंडेराव गंभीरे , सत्यदेव कोळी , आण्णा काळे, आदि ग्राप. सदस्य व तंटामुक्त समिती अध्यक्ष राजाराम आडसुळ , ग्रामसेवक लोमटे आणि गावकरी मंडळीनी पत्रकार बांधवांचा पत्रकार दिनाच्या निमित्त सत्कार करुन पुढील पत्रकारिता कार्यास शुभेच्छा दिल्या .

यावेळी सर्व पत्रकार बांधवांच्या वतीने दै . देशभक्तचे संपादक लक्ष्मण शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ग्राप . सदस्य तथा माजी पंस . उपसभापती लक्ष्मण आडसुळ यांनी केले .

# न्यास हे महाराष्ट्रासह संपूर्ण देशात लौकिक असून, धार्मिक व सांस्कृतीकतेचे प्रतिक : आमदार टी. राजा सिंह



अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरु केलेल्या महाप्रसादाच्या सेवेबरोबरच विविध उपक्रम हे धाडशी नेतृत्व व प्रबळ इच्छाशक्तीमुळेच न्यासाचा प्रचंड विस्तार होत आहे. न्यास हे महाराष्ट्रासह संपूर्ण देशात लौकिक असून, धार्मिक व सांस्कृतीकतेचे प्रतिक असल्याचे मनोगत तेलंगणा येथील गोशामहल विधानसभा मतदारसंघाचे हिंदुत्वनिष्ठ आमदार टी. राजा सिंह यांनी व्यक्त केले. ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र (ट्रस्ट) मंडळात आले असता आमदार सचिन कल्याणशेट्टी व मंडळाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलताना आमदार टी. राजा सिंह म्हणाले की, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची कार्य भक्ताभिमुख असल्याने आलेल्या स्वामी भक्त हा न्यासाला भेट देऊन महाप्रसाद घेतोच, भक्तांसाठी केलेल्या आवश्यक सोयीसुविधा ह्या गरज ओळखून मांडणी करण्यात आलेले आहे. म्हणूनच संपूर्ण परिसर हा स्वच्छ व सुंदर असून, न्यासाची बांधणी उत्तमरित्या केली आसल्याचे मनोगत आमदार टी. राजा सिंह यांनी व्यक्त केले. त्यांच्या समवेत आमदार सचिन कल्याणशेट्टी, मिलन कल्याणशेट्टी, योगेश पवार, ऋषी लोणारी, राजकुमार झिंगाडे, नागेश कलशेट्टी हे उपस्थित होते.यावेळी न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, एस.के.स्वामी, सिद्धराम कल्याणी, बाळासाहेब घाडगे, कल्याण देशमुख, प्रविण घाटगे, निखील पाटील, सौरभ मोरे, वैभव मोरे, सुमित कल्याणी, गोविंद शिंदे, दत्ता माने, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# पत्रकार दिना निमित्त राष्ट्रीय पत्रकार महासभा पदाधिकारी यांचे ग्रामीण भागातील आदिवासी विद्यार्थीना मदत सेवाकार्य...!

खडवली/सुभाष पटनाईक : ठाणे जिल्ह्या येथील कल्याण तालुका ग्रामीण भागातील खेडेगावात गरीब आदिवासी समाज मोल-मजुरी करून,आजही जगत आहेत. फार काबाड कष्ट करून, आपल्या हालाकीच्या परिस्थितीत आपल्या कुटुंबाचे कसेतरी उदरनिर्वाह भागवीत आहेत.आर्थिक संकटा मुळे आदिवासी समाजातील विद्यार्थांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे.मात्र शासनाच्या तुटपुंज्या शिक्षण योजनेनुसार खडवली,खापरवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत आदिवासी सर्वच विद्यार्थांना एका खोलीत शिक्षण देत असल्याचे वृत्त समजताच राष्ट्रीय पत्रकार महासभा च्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या शाळेला भेट दिली. तसेच त्यांना मदतीचा हात देवून,विशेष सहकार्य केले.




राष्ट्रीय पत्रकार महासभाव श्री.केअर ओल्ड एज होम्स ट्रस्ट,मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ६ जानेवारी रोजी मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या पत्रकार दिनाचे औचित्य साधून ५ जानेवारी रोजी दुपारी ३ नंतर जिल्हा परिषद शाळेत आदिवासी विद्यार्थांना मदत सेवा म्हणून चादर,गोंधडी, शैक्षणिक साहित्य देवून विशेष मदत करण्यात आली.

या विशेष कार्यक्रमात राष्ट्रीय पत्रकार महासभा चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार सुभाष पटनाईक,प्रदेश महिला अध्यक्षा डॉ.वैष्णवी अय्यर,प्रदेश संरक्षक आशिष रेळे हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. खडवली पोलीस चौकीच्या पोलीस उपनिरीक्षक मोहिनी कपिले मॅडम उपस्थित राहून, कार्यक्रमाची शोभा वाढविली.प्रदेश महासचिव डॉ.सुरेश ओगले, प्रदेश सचिव संजय भोराडे ,ठाणे जिल्हा मुख्य संघटक संजय गायकवाड,प्रदेश सदस्य व कार्यक्रमाचे निमंत्रक गजानन सकट हे प्रमुख पाहुणे म्हणून आवर्जून उपस्थित राहिले होते.आदिवासी विद्यार्थांना व त्यांच्या पाल्यांना मदत सहकार्य म्हणून अल्पोहार ,कान टोपी,चादर,थंडीसाठी त्यांचे संरक्षण करण्यासाठी उबदार गोंधडी वाटण्यात आले. जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.भारती वानखेडकर या नियमित उपस्थितीत राहुन निस्वार्थ सेवेने ४० ते ५० आदिवासी विद्यार्थांना सहा महीन्यापासुन शिक्षण देत आहेत.या कार्यक्रमाला त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांचे आभार प्रदर्शन व शाल पुष्पगुच्छ सह सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे डॉ.वैष्णवी अय्यर व सुभाष पटनाईक यांनी मधुर गाणी गाऊन आदिवासी विद्यार्थांचे विशेष मनोरंजन केले.उपस्थितीत मान्यवरांनी विद्यार्थांना मोलाचे मार्गदर्शन केले.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका प्रमुख तानाजी लोणे यांनी केले.पत्रकार सुभाष शेंडगे,संदीप मुकने,पप्पू मुकने,रघुनाथ मुकने उपस्थित राहील्याने त्यांचेही कार्यक्रमात विशेष सहकार्य लाभले.



# पत्रकार दिनानिमित्त अक्कलकोट तालुक्यातील पत्रकाराचे आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी केले सत्कार



अक्कलकोट/प्रतिनिधी : मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक, आद्यपत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त पत्रकार दिवस साजरा करण्यात येतो त्यांनी मराठी पत्रकारितेचा पाया भक्कम करण्यासाठी मोलाचे कार्य केले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो त्या निमित्त स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानच्या माध्यमातून अक्कलकोट आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी अक्कलकोट तालुक्यातील सर्व पत्रकाराचे सन्मान करून सत्कार केले.यावेळी तालुक्यातील विविध विषयावर पत्रकरासोबत संवाद साधला यावेळी सचिन बनसोडे यांनी पत्रकारांना शुभेच्या दिले.यावेळी कमलाकर सोनकांबळे, प्रवीण देशमुख, बाबा निंबाळकर,शिवानंद फुलारी,अरविंद पाटील,मारुती बावडे,गौतम बाळशंकर,सचिन बनसोडे, महेश गायकवाड, रविकांत धनशेट्टी, बसवराज बिराजदार, नंदकुमार जगदाळे,स्वामीराव गायकवाड,रमेश भंडारे,राजेश जगताप,शिवानंद याळवार, शिवानंद गोगांव यावेळी राजकुमार झिंगाडे, प्रकाश पाटील, चंद्रकांत दसले , नागेश कलशेट्टी उपस्थित होते. यावेळी पत्रकार दिनानिमित्त तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांना शुभेच्छा देण्यात आले.

# शिरोळ तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा ८ व ९ जानेवारीला उदगावमध्ये

शिरोळ/प्रतिनिधी : जिल्हा परिषद कोल्हापूर शिक्षण विभाग, पंचायत समिती शिरोळ च्या वतीने तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा उदगाव येथे संपन्न होणार आहे.सोमवार दि.८ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ८.३० वाजता खासदार धैर्यशील माने व आमदार डॉ.राजेंद्र पाटील यड्रावकर यांचे शुभहस्ते होणार आहे.श्री दत्त साखर कारखाना शिरोळ चे चेअरमन उद्यान पंडीत गणपतराव पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत.

गट विकास अधिकारी शंकर कवितके,सहाय्यक गटविकास अधिकारी प्रदिप पाटील,गट शिक्षण अधिकारी भारती कोळी,शिक्षण विस्तार अधिकारी दिपक कामत,अनिल ओमासे,क्रीडा विभागप्रमुख नारायण पाटील,सौरभ पाटील, मुख्याध्यापक शंकर जंगम, स्कूल कमिटीचे चेअरमन व सदस्य,केंद्र प्रमुख यशवंत पेठे, सर्व केंद्रप्रमुख,शिक्षक संघटना प्रतिनिधी,शिक्षक बँक व पतसंस्थाचे चेअरमन व संचालक यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. स्पर्धेचे नियोजन पुढील प्रमाणे -सोमवार दि. ८जानेवारी रोजी लहान गट सांघिक खो खो व कबड्डी स्पर्धा उदगाव येथे पार पडतील.तर मोठा गट वैयक्तिक धावणे -१००,२००, ४००,६०० मीटर,लांब व उंच उडी, गोळा व थाळी फेक,कुस्ती -४०,४५,५०कि.ग्रॅ. व४१०० रिले केंद्रीय शाळा दत्तनगर दत्त कारखाना शिरोळ येथे होतील. मंगळवार दि.९जानेवारी रोजी मोठा गट सांघिक खो खो, कबड्डी,लहान गट वैयक्तिक धावणे -५० व१०० मीटर,लांब व उंच उडी,कुस्ती -२५,३०,३५ कि.ग्रॅ.या स्पर्धा उदगाव येथे होणार आहेत.बक्षिस वितरण ज्या त्या दिवशी संध्याकाळी करणेत येईल.स्पर्धेचे संयोजन चिपरी केंद्र करीत आहे.

# काशिनाथ भरमशेट्टी यांचे कार्य कधीही विसरता येणार नाही

## स्वामी समर्थ कारखान्याचे चेअरमन संजीवकुमार पाटील

अक्कलकोट/गौतम बाळशंकर : स्वामी समर्थ साखर कारखान्याचे उपाध्यक्ष स्व.काशिनाथ भरमशेट्टी हे एक कार्यशील,कृतिशील आणि ध्येयवादी नेते होते.त्यांच्यामुळे या भागात विकासाची गंगा आली.त्यांचे कार्य या भागातील जनतेला कधीही विसरता येणार नाही.त्यांचे अधुरे कार्य पुढे नेणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल आणि हे काम आता के.बी प्रतिष्ठान करेल,असा आशावाद स्वामी समर्थ कारखान्याचे अध्यक्ष संजीवकुमार पाटील यांनी व्यक्त केला.शनिवारी,हन्नूर (ता.अक्कलकोट) येथे भरमशेट्टी यांच्या सातव्या पुण्यतिथीनिमित्त के.बी.प्रतिष्ठान व भरमशेट्टी परिवाराच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.त्यावेळी ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे माजी सदस्य तुकाराम बिराजदार होते.व्यासपीठावर माजी उपसभापती सिध्दार्थ गायकवाड,सागर दर्गोपाटील,अशपाक अगसापुरे,व्यंकट मोरे,राजू चव्हाण,इरसंगप्पा गड्डे,राजकुमार पाटील,सिध्दाराम भंडारकवठे,बसवराज बाणेगांव,संजय बाणेगाव,राहुल बिराजदार, हेमंत हंडगे,अजय सगट,रेवणसिध्द बिराजदार आदींची उपस्थिती होती.प्रारंभी प्रतिमा पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.प्रतिष्ठानचे आधारस्तंभ विश्र्वनाथ भरमशेट्टी, राजकुमार भरमशेट्टी व क्रांती दर्गो पाटील- भरमशेट्टी,डॉ.नेहा येळापुरे -भरमशेट्टी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.या कार्यक्रमात कुरनूरचे सरपंच व्यंकट मोरे,बाळासाहेब मोरे,सिद्धाराम भंडारकवठे आदींनी भरमशेट्टी यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याची प्रशंसा केली.यानिमित्त पत्रकार दिनाचे अवचिते साधून पत्रकार मारुती बावडे व पत्रकार गौतम बाळशंकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. महादेव मंदिर येथे अश्र्विनी ब्लड बँक कुंभारी व सोलापूर यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या शिबीरात ११४ जणांनी रक्तदान केले. होते.नोबल हॉस्पिटलचे चेअरमन डॉ. अमजद सय्यद व डॉ.बसवराज सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या टीमने ४२ जणांची मोफत ईसीजी व १४२ जणांची रक्तातील कोलेस्ट्रॉलची तपासणी केली.यावेळी सहभागी रक्तदात्यांना के.बी.प्रतिष्ठानकडून प्रवाशी बॅग देण्यात येणार आली.यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष वैभव भरमशेट्टी , उपाध्यक्ष रमेश छत्रे,सचिव गौरीशंकर भरमशेट्टी,ॲड.विशाल भरमशेट्टी, राजकुमार भरमशेट्टी,शीतल भरमशेट्टी,बसवणप्पा सुतार,संतोष बाळशंकर,युवराज बाळशंकर, योगीराज भरमशेट्टी,शब्बीर मुल्ला,सचिन बिडवे,चंद्रकांत जंगले,नरेंद्र जंगले,गौतम बाळशंकर ,निरंजन हेगडे,परशुराम बाळशंकर आदी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी के.बी प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी व हन्नूर ग्रामस्थांनी प्रयत्न केले.




# आरक्षणासाठी आदिवासी समाजात घुसखोरी होऊ देणार नाही : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले



मुंबई : आरक्षणासाठी आदिवासी समाजात इतर कोणाचीही घुसखोरी नको अशी आदिवासी समाजाची मागणी आहे. आदिवासी समाजात समावेश करावा म्हणून अनेक जातींकडुन मागणी होत आहे. या पार्श्र्वभुमीवर आदिवासींना संविधानाने दिलेला आरक्षणाचा हक्क हिरावला जाणार नाही, आदिवासींना मिळणा-या ७.५ टक्के आरक्षणात इतरांची घुसखोरी होऊ देणार नाही. ज्या जाती आदिवासी आहेत त्यांना त्यांचा हक्क मिळवुन देवू तसेच आदिवासींवर अन्याय होणार नाही याची काळजी राज्य आणि केंद्र सरकार घेईल अशी ग्वाही आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी दिली.

धुळे जिल्हयातील पिंपळनेर येथे रिपब्लिकन पक्षाच्या आदिवासी आघाडी तर्फे आयोजित आदिवासी एकता महामेळाव्यात प्रमुख मार्गदर्शन म्हणून ना. रामदास आठवले बोलत होते. यावेळी रिपाइंचे रमेश मकासरे, प्रकाश लोंढे, रिपाइंचे गुजरात राज्य अध्यक्ष अशोक कुमार भट्टी, शशिकांत वाघ, भाजपचे भरत गावीत, मोहन सुर्यवंशी, शिवसेना शिंदे गटाचे ॲड. ज्ञानेश्र्वर ए. खंडे, आणि या आदिवासी मेहामेळाव्याचे आयोजक रिपाइंचे आदिवासी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष संदीप देवरे उपस्थित होते.

काँग्रेस आणि विरोधक केंद्र सरकारवर टीका करतांना संविधान बदलणार अशी खोटी अफवा पसरवीत आहेत. महामानव डाँ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेले संविधान हे परिपुर्ण संविधान आहे. ते कधीही बदलले जाणार नाही. संविधान बदलणारे स्वतचे बदलले जातील पण संविधान कधीही बदलणार नाही. मोदी हे संविधानाचे संरक्षण आहेत. दलित आदिवासींसाठी प्रधानमंत्री मोदींचे सरकार काम करीत आहे. सबका साथ, सबका विकास, सबका विश्र्वास आणि सबका प्रयास यानुसार मोदी सरकार काम करीत आहे.

देशाच्या राष्ट्रपती पदाचा बहुमान दलित समाजातुन आलेल्या रामनाथ कोविंद यांना देण्यात आला होता. आता देशाच्या राष्ट्रपती पदाचा बहुमान आदिवासी समाजातुन येणा-या नेत्या द्रोपदी मुर्मु यांना देण्यात आला आहे. त्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे योगदान आहे. त्यामुळे विकास पुरुष नरेंद्र मोदींना तिस-यांदा प्रधानमंत्री बनवण्यासाठी दलित, आदिवासी बहुजन जनता बहुमताने त्यांच्या पाठीशी उभी राहील. असे ना. रामदास आठवले यावेळी म्हणाले. आदिवासींचे सर्व प्रश्र्न सोडविण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार आदिवासीं सोबत असल्याची ग्वाही ना. रामदास आठवले यांनी दिली. यावेळी आदिवासी तरुण मोठया संख्येने उपस्थित होते.

# शिवसेना महिला आघाडीच्या वतीने पत्रकाराचा सत्कार



अक्कलकोट/प्रतिनिधीः पत्रकार दिनानिमित्त शिवसेना महिला आघाडी वतीने पत्रकाराचा सत्कार शिवसेना तालुकाप्रमुख संजय अण्णा देशमुख, कामगार सेना तालुकाप्रमुख स्वामीनाथ हेगडे , शिवसेना महिला आघाडी वैशालीताई हावनूर, यांच्या उपस्थिती कार्यक्रम घेण्यात आले यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष कमलाकर सोनकांबळे, रविकांत धनशेट्टी,

बसवराज बिराजदार, महेश गायकवाड, विश्र्वनाथ चव्हाण, गौतम बाळाशंकर यांचे सत्कार करून शुभेच्छा दिले. यावेळी कामगार सेना महिला आघाडी शहर प्रमुख जयश्री कोलाटी, शहर उपप्रमुख अश्र्विनी पाटील महादेवी खुबा वर्षाताई मैत्रे महिला आघाडी शाखा प्रमुख गंगाबाई स्वामी युवा सेना शहर प्रमुख विनोद मदने व सर्व पदाधिकारी उपस्थित होते

# भारतीय जैन संघटनेच्यावतीने ॲक्युप्रेशर शिबिराचे आयोजन

सोलापूर/प्रतिनिधीः भारतीय जैन संघटनेच्यावतीने ९ ते १४ जानेवारी दरम्यान ॲक्युप्रेशर शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हाध्यक्ष देशभूषण व्हसाळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. हे शिबिर पंडित विद्यावाचस्पती वर्धमान शास्त्री भवन, विजापूर रोड येथे होणार आहे. सहा दिवसांसाठी दीडशे रुपये फी आकारण्यात आली आहे.

सकाळी ९ ते दुपारी १ आणि सायंकाळी ४ ते रात्री ७.३० पर्यंत हे शिबिर होणार आहे. यासाठी नाव नोंदणी सुरू आहे. या शिबिरात जयपूरचे प्रसिध्द तज्ज्ञ डॉ. सत्यनारायण चौधरी हे रुग्णांची जुनी डोकेदुखी, कान, नाक, गुडघ्याचे त्रास, लठ्ठपणा, ब्लड प्रेशर, शुगर, गॅस धरणे, कंबर दुखी, मानसिक तणाव, हातापायांना येणाऱ्या मुंग्या अशा अनेक आजारांवर ॲक्युप्रेशरद्वारे किंवा व्हायब्रेशन थेरपी करणार आहेत.

याचा लाभ सर्वांनी घ्यावा तसेच नाव नोंदणीसाठी श्याम पाटील (८९९९९०८६६०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

# अक्कलकोट तालुक्यातील पत्रकार बांधवांच्या रिपाइंच्या वतीने सत्कार

अक्कलकोट/प्रतिनिधी : तालुक्यातील पत्रकार बांधवांना रिपाइं आठवले गटाचे तालुकाध्यक्ष अविनाश मडिखांबे तसेच भाजपा अल्पसंख्याक नन्नू कोरबु यांच्या वतीने सर्व पत्रकार बांधवांचे सत्कार करण्यात आले.

ावेळी बाबा निंबाळकर,शिवानंद फुलारी,अरविंद पाटील,मारुती बावडे, कमलाकर सोनकांबळे,प्रवीण देशमुख,विश्र्वनाथ चव्हाण,गौतम बाळशंकर, नंदकुमार जगदाळे,स्वामीराव गायकवाड,रमेश भंडारे,राजेश जगताप,बसवराज बिराजदार,रविकांत धनशेट्टी,गणेश भालेराव,शिवानंद याळवार,निंगराज निंबाळ,सचिन बनसोडे यावेळी रिपाइं आठवले गटाचे अविनाश मडिखांबे,भाजपा अल्पसंख्याक जिल्हा अध्यक्ष नन्नू कोरबु,जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,रासपाचे तालुका अध्यक्ष दत्ता माडकर, शहर अध्यक्ष अजय मुकणार,सलिम शेख,शकील नाईकवाडी,अश्पाक शेख,रशीद किस्तिक,अंबादास गायकवाड, राजु भगळे,आंदेवाडीचे सरपंच रमेश धोडमनी, सुरेश सोनकांबळे आदि उपस्थित होते. याप्रसंगी ता अध्यक्ष मडिखांबे यांनी सर्व पत्रकार बांधवाना पेटा बांधून त्याना पेन देऊन व केक कापून सत्कार करण्यात आले. यावेळी पत्रकार दिनानिमित्त तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांना अविनाश मडिखांबे यांनी शुभेच्छा देण्यात आले.

